# स्थापनेची द्‌विशताब्दीपूर्ती केलेल्या पुण्याच्या गौरवशाली डेक्कन कॉलेज अभिमत विद्‌यापीठाची यशस्वी वाटचाल
# (१८२१-२०२१)

**हिंदू कॉलेज (१८२१-१८५१)**

पुण्यातील १८२१ साली स्थापित केलेले डेक्कन कॉलेज हे भारतातील तिसरे आणि महाराष्ट्रातील पहिले सर्वात जुने महाविद्‌यालय आहे. पेशवेकाळात वेदशास्त्रांच्या अभ्यासासाठी संस्कृत पाठशाळांना शिष्यवृत्ती म्हणून सरसेनापती खंडेराव दाभाडे यांच्या मृत्युपत्रातील तरतूदीनुसार दक्षिणा निधी उपलब्ध करून दिला जात असे. दक्षिणा निधीतून पुणे येथे एक ‘संस्कृत पाठशाळा’ उदयास आली. धर्म, साहित्य, तत्वज्ञान आणि व्याकरण हे विषय पारंपारिकपणे शिकवणारे पंडित ही पाठशाळा चालवत होते. पेशव्यांच्या राज्याच्या शेवटी, बॉम्बे प्रेसिडेन्सीचे तत्कालीन गव्हर्नर माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी आपल्या कारकिर्दीत एक मराठी जाहीरनामा काढला ज्यामध्ये त्यांनी असे वचन दिले होते की ब्रिटीश सरकार पेशव्यांच्या सर्व धार्मिक, शैक्षणिक व सेवाभावी संस्थांचे संरक्षण करेल. आपल्या आश्वासनांचे पालन करत त्यांनी दक्षिणा निधी योजनेअंतर्गत ६ ऑक्टोबर १८२१, विजयादशमीच्या दिवशी पुण्याच्या विश्रामबागवाड्‌यात संस्कृत पाठशाळेचे विलीनीकरण करून ‘हिंदू कॉलेज’ची स्थापना केली. प्राचीन शास्त्रांबरोबर हिंदू कायदा व गणित या विषयांचाही समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला. पहिल्या वर्षी १४३ विद्‌यार्थ्यांना आकर्षित करून कॉलेजने भक्कम मुहूर्तमेढ रोवली खरी, पण त्याचे महत्त्व सरकारला पटवण्यासाठी एलफिन्स्टन यांना मोठा संघर्षही करावा लागला.

**पूना कॉलेज (१८५१-१८६४)**

पुढे हिंदू कॉलेज आणि इंग्रजी शाळा (इंग्लिश स्कूल) यांचे विलीनीकरण केले गेले आणि त्यानंतर ७ जून १८५१ रोजी पुणे येथे एल्फिन्स्टन संस्थेच्या धरतीवर ‘पूना कॉलेज’ या नावाने एक नवीन महाविद्‌यालय स्थापन झाले, जे केवळ संस्कृत अभ्यासासाठी विशेषतः ब्राह्मण आणि हिंदू समाजापुरते मर्यादित राहिले नाही. या महाविद्‌यालयास सर थॉमस कॅन्डी (१८५१-१८५७), सर एडवीन अर्नाल्ड - कवी, पत्रकार आणि दि लाईट ऑफ एशिया चे लेखक (१८५७-१८६०), डब्ल्यु. ए. रसेल (१८६०-१८६२), विल्यम वर्ड्‌सवर्थ - प्रसिद्ध इंग्रजी कवी विल्यम वर्ड्‌सवर्थ यांचे नातू (१८६२-१८७४) यांसारखे थोर व्यक्ती प्राचार्य म्हणून लाभले. ज्यांच्या कारकिर्दीत महाविद्‌यालयाने जबरदस्त प्रगती केली आणि संपूर्ण दख्खन प्रांतात खूप नावलौकिक मिळविला.

**डेक्कन कॉलेज (१८६४-१९३४)**

विश्रामबागवाड्‌याची जागा अपुरी पडू लागली म्हणून १८६३ मध्ये हे महाविद्‌यालय विश्रामबागवाड्‌यातून पुणे उपनगरातील वानवडी येथे हलविण्यात आले. परंतु विद्‌यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता या महाविद्‌यालयासाठी कायम स्वरूपाच्या प्रशस्त इमारतीची सोय करण्याची गरज भासू लागली आणि त्यासाठी दुसरे बॅरोनेट सर जमसेदजी जीजीभॉय यांनी एक लाख रुपयांचे

अनुदान दिले आणि हे नवीन इमारतीचे स्वप्न पूर्ण झाले. १५ ऑक्टोबर १८६४ मध्ये पुणे शहराबाहेर येरवडा येथे रम्य परिसरात विद्यमान इमारतीची आधारशीला तेव्हाचे बॉम्बेचे गव्हर्नर सर हेन्री बार्टल फ्रेरे यांच्या हस्ते रोवण्यात आली. वास्तू बांधकामाचे कार्य पूर्णत्वास आल्यानंतर सन १८६८ मध्ये व्हिक्टोरियन निओ-गॉथिक वास्तूकला शैलीत बांधलेल्या सध्याच्या या दिमाखदार वास्तूत कॉलेजचे स्थलांतर झाले आणि त्याचे नामांतर 'डेक्कन कॉलेज' असे करण्यात आले. शतकाच्या अखेरपर्यंत पंधराशे इंग्रजी व सुमारे पाचशे इतर ग्रंथांची आवक कॉलेजमध्ये झाली. भारताच्या सर्व प्रांतांतून हस्तलिखितांचा मोठा संग्रहही कॉलेजकडे जमा झाला. संस्कृत, इंग्रजी साहित्य, मराठी, फारसी, लॅटिन, प्राच्य भाषा, इतिहास, राजकीय अर्थव्यवस्था, गणित, तर्कशास्त्र, नैतिक तत्वज्ञान इत्यादी विषय अभ्यासक्रमात समाविष्ट झाले. विद्यार्थ्यांसाठी अनेक शिष्यवृत्त्या, जिमखाना व वसतिगृहाच्या सोयी निर्माण झाल्या. त्यामुळे सर्वच दख्खन इलाख्यातून मोठा विद्यार्थीवर्ग डेक्कन कॉलेजकडे येऊ लागला. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, गुरुदेव रानडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, कोषशास्त्रज्ञ वामन शिवराम आपटे, आर.एन. दांडेकर, संगीतज्ञ विष्णू नारायण भातखंडे, जस्टीस पी.बी. गजेंद्रगडकर, सेनापती बापट, डॉ. द्वारकानाथ कोटणीस अशा अनेकांनी डेक्कन कॉलेजमधून अध्ययनाचे धडे घेतले तर लॉरेन्झ फ्रॅन्झ किलहोर्न तसेच सर आर. जी.भांडारकर (हे या महाविद्यालयाचे विद्यार्थीही होते) या नामवंतांची प्राध्यापक म्हणून कारकीर्द येथे पार पडली.

**डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था (१८३९-१९९४)**

पुढे शहराबाहेरील डेक्कन महाविद्यालयात शिक्षण घेणे विद्यार्थांना दिवसेंदिवस महागडे भासू लागले आणि त्याचवेळेस म्हणजे विसाव्या शतकाच्या प्रारंभी पुणे शहराच्या मध्यवर्ती परिसरात काही नवीन महाविद्यालये उदयास आली होती, जेथे विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे सोयीचे ठरत होते. याचा परिणाम असा झाला की या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत गेली. त्यानंतर निकृष्ट आर्थिक परिस्थितीचे कारण पुढे करत ब्रिटीश सरकारने १९३४ मध्ये एकोणीसाव्या शतकात अग्रणी ठरलेले डेक्कन कॉलेज कायमचे बंद करण्याचा निर्णय घेतला. तत्कालीन माजी विद्यार्थ्यांनी या निर्णयाविरुद्ध मोठा लढा दिला. उच्च न्यायालयानेही त्यांच्याच बाजूने निर्णय देत शासनाला हे कॉलेज पुन्हा सुरू करून कायमस्वरूपी त्याची जबाबदारी उचलण्याचा महत्त्वाचा निर्णय दिला. परिणामी, १७ ऑगस्ट १९३९ या दिवशी डेक्कन कॉलेज पुनरुज्जीवित झाले आणि ते 'डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था' या नव्या नावाने पुन्हा सुरू झाले. झोरोएस्ट्रियन विद्वान आणि भाषाशास्त्रज्ञ डॉ. इराच जे.एस. तारापोरवाला हे १९३९ ते १९४२ मध्ये या संस्थेचे प्रथम संचालक होते. साधारण सव्वाशे एकरांच्या परिसरामध्ये सुरू झालेले हे कॉलेज पुरातत्त्वशास्त्र आणि भाषाशास्त्रामधील एक प्रमुख शैक्षणिक आणि संशोधन केंद्र म्हणूनच उदयाला आले. ही घटना देशातील शिक्षण व संशोधन क्षेत्राचा मानबिंदू उंचाविणारी होती कारण भारतात पुरातत्त्वशास्त्र व भाषाशास्त्र या दोन महत्त्वपूर्ण विद्याशाखांचे संशोधन विभाग सर्वात प्रथम सुरु करण्याचा मान या संस्थेकडे आहे. तेव्हापासून भाषा, संस्कृती आणि पुरातत्त्व

वारशाबाबत शास्त्रीयदृष्टया शिक्षण- प्रशिक्षण आणि संशोधन करू शकणारी पिढी घडविण्याचे महत्त्वाचे कार्य ही संस्था करत आहे.

संस्थेसाठी १९४२ ते १९७१ या दीर्घ कालावधीमध्ये द्वितीय संचालक म्हणून योगदान दिलेले विख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. सुमित्र मंगेश कत्रे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचा सर्वांगीण विकास होऊ लागला. त्यांनी सुरू केलेल्या भाषाविज्ञानाच्या उन्हाळी व हिवाळी भाषाशास्त्र अभ्यासवर्गांचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांनी भारताच्या विविध भागात या विद्याशाखेचा प्रसार केला. भारतातली पहिली ध्वनीशास्त्र प्रयोगशाळा डेक्कन कॉलेजमध्ये सुरू झाली. रॉकफेलर फौंडेशनच्या अनुदानातून मोठे संशोधन प्रकल्पही संस्थेत सुरू झाले.

प्राचीन भाषांच्या तौलनिक अभ्यासासाठी प्रमाण शब्दकोशांची गरज भासत होती. परंतु जसे ग्रीक व लॅटिन भाषांसाठी उपलब्ध होते तसे संस्कृतसाठी कोणतेही प्रमाण शब्दकोश उपलब्ध नव्हते. ही उणीव भरून काढण्यासाठी डॉ. कत्रे यांनी संस्थेमध्ये ऐतिहासिक तत्त्वांवर आधारित संस्कृत शब्दकोश प्रकल्प सुरू केला. ऋग्वेदापासून अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत निर्माण झालेल्या सुमारे दोन हजार ग्रंथांचे प्रत्यक्ष वाचन या संस्थेमध्ये झाले (१९४९ ते १९७३). त्यातून तेवीस लक्ष शब्दांच्या एक कोटी संदर्भांनी युक्त असे स्क्रिप्टोरियम सुसज्ज झाले. पुरातत्त्वीय अवशेषांच्या अभ्यासाबरोबरच वाङ्मयीन पुराव्यांच्या अभ्यासासाठी एक प्रमाणभूत साधन याद्वारे उपलब्ध झाले. वेद, वेदांत, दर्शन, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, गणित, रसायनशास्त्र, कृषिशास्त्र, शिल्पशास्त्र अशा तब्बल ६२ विद्याशाखांमधून अनेक शब्दांचे आणि त्यांच्या संदर्भांचे संकलन केले असून त्यांची रचना तसेच त्यांचे अर्थ हे ऐतिहासिक क्रमाने दिले जातात हे या विश्वकोशाचे वैशिष्ट्य आहे. या कोशाचे ३५ खंड आजवर प्रकाशित झाले आहेत.

डॉ. कत्रे यांनी भाषाविज्ञानासाठी जे अग्रगण्य कार्य केले तेच डॉ. हसमुख धीरजलाल सांकलिया यांनी पुरातत्त्वशास्त्रासाठी केले. यांच्या पुढाकाराने देशातील पहिला पुरातत्वशास्त्राचा विभाग कॉलेजमध्ये सुरू झाला. या विभागाने प्रागैतिहासिक, इतिहासपूर्व व ऐतिहासिक काळाशी संबंधित ठिकाणी व्यापक उत्खनने हाती घेतली. उदा. नेवासा, इनामगाव, नायकुंड, भीमबेटका, बालाथल, लोथल, जुन्नर, फर्माना, राखीगडी इत्यादी. या विभागातील संशोधकांनी उत्खनन न केलेला प्रदेश भारताच्या नकाशावर अपवादानेच आढळेल. इनामगाव येथील उत्खननाने आद्य शेतकरी समूहाची जीवनशैली उजेडात आणली, पण त्याचबरोबर अवशेषांच्या अभ्यासाची शास्त्रीय पद्धत व संशोधन मानके सुद्धा जगासमोर ठेवली. प्राचीन इतिहास, मानव्यशास्त्र, मूर्ती व स्थापत्यशास्त्र, चित्रकला, नाणकशास्त्र, पुराभिलेख, प्राचीन साहित्य अशा अनेक विद्याशाखा येथे अभ्यासल्या जातात. खऱ्या अर्थाने बहुविद्याशाखीय अभ्यास येथे चालतो आणि त्यातून प्राचीन कालखंडाचे चित्र साकारण्याचा प्रयत्न केला जातो. पुरातत्वशास्त्राशी संबंधित वेगवेगळ्या शाखा आणि उपविषयांमध्ये सखोल मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या तज्ज्ञ मंडळींचे मार्गदर्शन या विभागातून विद्यार्थ्यांना

मिळते. भारतातील विविध राज्यांमध्ये शास्त्रीय पद्धतीने मूलभूत संशोधन आणि उत्खनन, सर्वेक्षणाचे काम या विभागामार्फत चालते. मानवशास्त्र, समाजशास्त्र आणि मराठा इतिहास या विषयांतील संशोधनात देखील या विभागाने भरीव कामगिरी केलेली आहे.

**डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ), १९९४**

डॉ. कत्रे आणि डॉ. सांकलिया यांच्याप्रमाणेच डॉ. इरावती कर्वे, डॉ. सी.आर. शंकरन, डॉ. शां.भा. देव, डॉ. अ. मा. घाटगे, डॉ. म.अ. मेहेंदळे, डॉ. अशोक केळकर, डॉ. म.के. ढवळीकर, डॉ. वी.ना. मिश्रा, डॉ. के. पदय्या, डॉ. शोभना गोखले, डॉ. गो. बं. देगलूरकर, डॉ. मधुकर माटे, डॉ. वसंत शिंदे अशा मान्यवर संशोधकांनी अध्ययन-अध्यापन आणि ग्रंथलेखन करून संस्थेला जागतिक दर्जा प्राप्त करून दिला. भारत सरकारने आजवर संस्थेतील आठ माजी विद्यार्थ्यांचा व चार प्राध्यापकांचा पद्म पुरस्काराने, एक माजी विद्यार्थ्याचा व पाच प्राध्यापकांचा साहित्य अकादमी पुरस्काराने तर सात संस्कृत तज्ज्ञांचा राष्ट्रीय संस्कृत पंडित पुरस्काराने गौरव केला आहे. संस्थेच्या संशोधन विषयामधील अद्वितीय कामगिरीची नोंद घेऊन ५ मार्च, १९९० रोजी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने या संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला. संस्थेने १ जून १९९४ पासून एक अभिमत विद्यापीठ म्हणून आपल्या कार्याला प्रत्यक्षात सुरुवात केली.

**विविध ज्ञानशाखा आणि अभ्यासक्रम**

या विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र (एआयएचसी अ‍ॅन्ड आर्किऑलॉजी), भाषाशास्त्र (लिंग्विस्टिक्स), संस्कृत आणि कोशशास्त्र (संस्कृत अ‍ॅन्ड लेक्सिकोग्राफी) या तिन्ही विभागांमध्ये पदव्युत्तर पदवी, पदविका, प्रमाणपत्र आणि पीएचडी या चार वेगवेगळ्या टप्प्यांवरील अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. या ज्ञानशाखांतर्गत दोन वर्षे कालावधीचे व पूर्णवेळ स्वरूपाचे पदव्युत्तर पदवीचे (एम.ए.) अभ्यासक्रम चालविले जातात. संस्थेमध्ये चालविल्या जाणाऱ्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांमध्ये संशोधन पद्धती, कॉम्प्युटेशनल लिंग्विस्टिक्स, दक्षिण आशियामधील भाषांची ओळख, इटालियन, पर्शियन, जपानी आदी भाषा, आर्किऑलॉजी ऑफ बुद्धिझम, फोनेटिक्स फॉर स्कूल टीचर्स, भाषाशास्त्राची ओळख या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तर पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांमध्ये हेरिटेज साइट मॅनेजमेंट अँड सायंटिफिक कॉन्झर्व्हेशन, अंडरवॉटर आर्किऑलॉजी यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त संस्थेच्या सध्या सुरू असलेल्या कार्याच्या बळावर संग्रहालयशास्त्र, मराठा आणि मध्ययुगीन इतिहास, तसेच भारतीय आणि विदेशी भाषा या तीन विभागांचे भविष्यकालीन कार्य प्रस्तावित करण्यात आले आहे.

**प्रयोगशाळा आणि संग्रहालये**

केवळ सैद्धांतिक पातळीवरील धडे न देता, विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांमधून विषयांच्या जवळ नेण्याचे काम ही संस्था करत आहे. भाषाशास्त्र विभागामध्ये असणारी अत्याधुनिक प्रयोगशाळा भाषाशास्त्र आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा मिलाफ नेमकेपणाने उलगडवून दाखविते. प्राचीन अवशेषांचे शास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी नऊ सुसज्ज प्रयोगशाळा, विविध कालखंडातील संस्कृतींचे दर्शन

घडवणाऱ्या नऊ दालनांनी परिपूर्ण असे पुरावस्तु संग्रहालय ही पुरतत्त्व विभागाची संपदा आहे. पुरातत्त्वशास्त्र संग्रहालयामुळे मानवी इतिहासाच्या विविध टप्प्यांविषयी, पुरातन भारतीय सांस्कृतिक इतिहास आणि पुरातत्त्वशास्त्राविषयीची माहिती समजावून घेणे विद्यार्थ्यांना सहज शक्य होते. संस्थेतील संस्थेमध्ये मराठय़ांच्या इतिहासाची माहिती देणारे विशेष मराठा इतिहास संग्रहालय आहे. या संग्रहालयात प्राचीन दस्तावेज व पुरावस्तुंचा संग्रह असून संशोधकांना त्याचा लाभ होत आहे.

**ग्रंथालय**

संस्थेचे ग्रंथालय हे सांस्कृतिक वारशासंदर्भात महत्त्वाची आणि उपयुक्त माहिती उपलब्ध करून देणारे एक केंद्र म्हणूनच ओळखले जाते . भाषाविज्ञान, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्व, प्राच्यविद्या, संस्कृत, समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्र या विषयांतील एक अद्वितीय ग्रंथालय आहे. जुन्या डेक्कन कॉलेजकडून प्राप्त ६००० ग्रंथसंग्रहासह सुरु झालेल्या या ग्रंथालयात आज जवळपास दोन लाख पुस्तके आणि संदर्भग्रंथ, १२००० हस्तलिखिते, ४१४ संशोधन पत्रीकांची आवक, लोकमान्य टिळक, रियासतकार सरदेसाई यांच्यासह १२ विद्वानांचे देणगी दाखल प्राप्त झालेले खाजगी ग्रंथसंग्रह असा विशाल मौल्यवान ठेवा उपलब्ध आहे. या ग्रंथालय संग्रहात १५२३ पासून प्रकाशित झालेली काही दुर्मिळ ग्रंथसंपदा उपलब्ध आहे जी भारतातील अन्य ग्रंथालयात उपलब्ध नाही. या ग्रंथालयाचे कार्य पूर्णपणे संगणकीकृत पद्धतीने चालते. या ग्रंथालयाने १५२३ पासून ते १९४० मधील प्रकाशित ग्रंथांसह संस्थेची संशोधन प्रकाशने, संस्थेला सादर केलेले शोधनिबंध, आणि हस्तलिखितांचा संग्रह यांचे डिजिटायझेशन केले आहे. केवळ राज्यातून वा देशभरातूनच नव्हे, तर परदेशांमधूनही अनेक अभ्यासक या ग्रंथालयाचा लाभ घेत असतात, ते या ग्रंथालयातील आधुनिक सुविधांच्या आधारे आपली संशोधने परिपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करत असतात.

विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृहे आणि जिमखान्याची सुविधा तसेच संस्थेचे सुसज्ज ग्रंथालय, प्रयोगशाळा, वस्तुसंग्रहालये, ध्वनीशास्त्र प्रयोगशाळा व संस्कृत स्क्रिप्टोरियम ही पायाभूत संशोधनाची संसाधने अभ्यासकांना वरदान ठरली आहेत. प्राचीन इतिहास, संस्कृती, पुरातत्व, आणि भाषाविज्ञान या क्षेत्रातील मूलभूत संशोधनात भारताचा गौरव वाढवणा-या डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाने ६ ऑक्टोबर २०२१ रोजी आपल्या स्थापनेची दोनशे वर्षे पूर्ण केली आहेत. मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण व प्रतिमांकन तसेच गोरेवाडा, जुन्नर, बोरी येथील उत्खनन व अवशेषांचे संरक्षण- संवर्धन या विद्यमान प्रकल्पांसह, आगामी वर्षात नवीन छोटे अभ्यासक्रम, शैक्षणिक व्याख्याने, ग्रंथांचे लेखन-संपादन-प्रकाशन करण्याची योजना संस्थेने हाती घेतली आहे.

डॉ. तृप्ती मोरे
ग्रंथपाल
डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ), पुणे